# अमृता युनिव्हर्सिटीला 'ए-व्ह्यू' तंत्रज्ञानाबद्दल फिक्कीतर्फे राष्ट्रीय पुरस्कार

मुंबई - अमृता युनिव्हर्सिटीच्या खुला स्रोत असणाऱ्या 'ए-व्ह्यू' या ई-लर्निंग तंत्रज्ञानातल्या सर्वोत्तम कामगिरीबद्दल एफआयसीसीआयचा राष्ट्रीय पुरस्कार पटकावला आहे. निती आयोगाचे उपाध्यक्ष डॉ. अरविंद पानगारिया यांच्या हस्ते अमृता युनिव्हर्सिटीच्या ई-लर्निंग रिसर्च लॅबचे डायरेक्टर प्रा. कमल बिजलानी यांनी १२ व्या एफआयसीसीआय हायर एज्युकेशन समिटमध्ये हा पुरस्कार स्वीकारला. या कार्यक्रमाचे उद्घाटन मनुष्यबळविकासमंत्री प्रकाश जावडेकर यांच्यासह आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू आणि युरोपिअन कमिशनच्या सांस्कृतिक आणि शिक्षण विभागाच्या डायरेक्टर जनरल मार्टिन रिर्चेट्स यांनी केले. अमृता युनिव्हर्सिटीच्या ई-लर्निंग रिसर्च लॅबचे डायरेक्टर प्रा. कमल बिजलानी म्हणाले, ए-व्ह्यूच्या माध्यमातून उच्चशिक्षणातल्या सर्वोत्तम कामगिरीबद्दल एफआयसीसीआय पुरस्कार मिळाल्याने आम्हाला अत्यंत आनंद झाला आहे.